# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 07/05/2021 (शुक्रवार)

(सकाळ)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध पोलिस स्टेशन पारशिवनीची कार्यवाही

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 04 कि. मी. अंतरावर मौजा पोलारा शिवार येथे दिनांक 06/05/2021 चे 03.15 वा. ते 04.30 वा. दरम्यान पारशिवनी पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन पारशिवनी पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन एमएच– 15/बीएक्स– 6792 क्रमांकाच्या टाटा इंडीका गाडीला थांबवुन तपासणी केली असता त्यामध्ये एकुण 2(कारवड,गौरा) कि. 13,000/–रू. ही जनावरे निर्दयतेने वाहतुक करतांना दिसुन आला. घटनास्थळावरून 2 जनावरे व वाहनासह एकुण किंमती 1,63,000/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस नाईक रविन्द्र बर्वे, पो.स्टे. पारशिवनी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे वरील आरोपीविरुध्द कलम 11 (1)(छ)(ड)(च) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5(अ), 9 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम, तसेच कलम 119 मपोका सहकलम 34 भादवी काद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील फरार आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. संदीप कडु 9823722418 हे करीत आहे.

### गैरकायदयाची मंडळी

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 30 कि.मी अंतरावर मौजा सिंदेवानी येथे दिनांक 06/05/2021 चे 10.30 वा. दरम्यान आरोपी नामे– क्र. 1) सिध्दार्थ रामदास डोंगरे, 2) पंकज डोंगरे, 3) राजू डोंगरे, 4) नामदेव डोंगरे व 5) शोभा रामदास डोंगरे सर्व रा सिंदेवानी यांनी गैरकायद्याची मंडळी गोळा करून फिर्यादी नामे– रविन्द्र शेशराव डोंगरे 42 वर्ष रा. सिंदेवानी यांना म्हटले की ''तु घरातील सामान का फेकले'' या कारणावरून वादविवाद करून हातबुक्याने आरोपी क्र. 2 याने मारहाण केली. आरोपीतांनी फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करून ''माजला का याला गावातून हकला'' असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम 143, 323, 294, 506 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिपक मानवटकर मो नं 9657580153 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावर माथनी मौदा येथे दिनांक 05/05/2021 चे 16.45 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. दिपाली नसिब गोंधी वय 28 वर्ष रा. माथनी ता मौदा जि नागपुर ही घरी हजर असतांना तिचा पती आरोपी नामे– छोटु गोंधी व परीवारातील लोक गाडी घेवुन आले व गाडीमध्ये लोखंडी रॉड व धारधार तलवारी होत्या. आरोपी क्र. 1) नशिब गोंधी, रा. खरबी नागपुर, 2) छोटु गोंधी, रा. खरबी, 3) रामकली गोंधी, रा. खरबी, 4) ललीता गोसावि, रा. वाटोडा रोड नागपुर, 5) कलीता सोलंकी, रा. खरबी, 6) करन सोलंकी, रा खरबी व 7) विश्वनाथ गोसावि रा वाटोडा नागपुर यांनी कोणाला काहीही न विचारता फिर्यादीच्या आईच्या घराच्या बेडरूम मध्ये जावुन फिर्यादीची मुलगी वय 09 महीने हिला घेवुन जात होते. फिर्यादीने त्यांना अडविले असता तीची ननद नामे– 4) ललीता गोसावि, रा. वाटोडा रोड नागपुर, 5) कलीता सोलंकी, रा. खरबी व सासु 3) रामकली गोंधी यांनी फिर्यादीचे मागुन केस ओढुन तिला मागे ओढले व ''आम्ही मुलीची कस्टडी घेत आहोत'' असे म्हणुन मुलीला घेवुन जाते वेळी हे तुम्हाला खुप महागात पडेल असे म्हणुन जिवाने मारण्याची धमकी दिली. तसेच आरोपीतांनी ''आमची पोलीस स्टेशन ला जावुन तक्रार का केली'' असे बोलुन ते तीथुन निघुन गेले. फिर्यादी व आरोपीची 498 भादवि व घरेलु हिंसा बाबत केस मौदा येथे सुरू आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपीतांविरुध्द कलम 452, 448, 143, 147, 148, 149, 323, 504, 506 भादवि सहकलम 4, 27 शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री साखरकर हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील मौजा सातगाव फाटा उडडाणपुल येथे दिनांक 06/05/2021 चे 19:00 वा. ते 19.10 वा. दरम्यान फिर्यादी नामे– रविंद्र भाउराव उमक, वय 40 वर्ष, रा. प्लॉट नं 2 गाडगे बाबा सोसायटी नविन सुभेदार ले आउट अयोध्या नगर, नागपुर हे आपल्या ताब्यातिल ॲक्टीव्हा क्रं एमएच 31/डीवाय–5035 ने पत्नी सौ माधुरी भाउराव उमक ( मृतक ) वय 40 वर्ष व भाचा प्रमोद इंगळे वय 10 वर्ष असे मिळुन त्यांच्यया मोपेडवर बसुन मौजा सावंगी आसोला येथुन नागपुर येथे जात होते. त्यादरम्यान मौजा बुटीबोरी सातगाव पुलावरून मागुन येणारा ट्रक क्रं सीजी– 07/एएस– 8855 चा चलक नामे– नरेंद्रकुमार प्रेमलाल पर्स, वय 32 वर्ष, रा. गोरबागांव त.भिलाईगड जि.बलोदा राज्य छत्तीसगड याने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मोटार सायकला कट मरल्याने मोटरसायकलसह ते तिघेही खाली रोडवर पडले. या अपघातात सौ माधुरी रविंद्र उमक ही ट्रकच्या मागच्या चाकामध्ये आल्याने जागीच मरण पावली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337 भादंवी. सहकलम 134/177, 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि चौधरी पोस्टे बोरी 9273237381 हे करीत आहे.

2) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत मौजा मालेवाडा शिवार उमरेड भिसी रोड येथे दिनांक 05/05/2021 चे 21:00 वा. दरम्यान जगदीश भगवान चौधरी, वय 30 वर्ष, रा. खापरी ता. चिमुर जि. चंद्रपुर हे नागपुर वरून त्याचे राहते गावी खापरी धर्मु ता. चिमुर येथे आपले एमएच– 34/एजी– 9794 क्रमांकाच्या मोटरसायकलने त्यांचा मित्र नामे– विशाल डडमल, वय 32 वर्ष यांच्यासह जात हाते. त्यादरम्यान एमएच– 14/ जिए– 0413 क्रमांकाचा कारचा चालक आरोपी नामे– सुनिल इरदंडे याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन एमएच– 34/एजी– 9794 क्रमांकाच्या मोटरसायकला मागुन धडक दिली. या अपघातात जगदीश भगवान चौधरी यांच्या मृत्यु झाला. तर विशाल डडमल, वय 32 हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– रोशन गुरूदास चौधरी वय 28 वर्ष रा. खापरी धर्मु ता. चिमुर जि. चंद्रपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी जखमी असल्याने अटक नाही गुन्हयाचा पुढील तपास सपोनी भस्मे पोस्टे भिवापुर मो नं 9764946808 हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावर मौजा डिलेवरी प्रायव्हेट लिमिटेड लॉजिस्टीक पार्क येथे दिनांक 06/05/2021 चे 13.15 वा. दरम्यान मृतक नामे– अमित संतोष चौधरी, वय 23 वर्ष, रा. तेलगाव ता. कारंजा जि. वर्धा हा तीन दिवसापासुन मशीन रिपेरिंगकरीता डीलेवरी प्राव्हेट लिमिटेड लॉजिस्टीक पार्क 14 मैल येथे आला होता. रिपेरिंग करते दरम्यान त्याचा हात मशीन मध्ये गेल्याने त्याच्या हाताला व नाकातुन रक्त निघालेले. मृतक याला उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथे नेले असता डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– देवेन्द्र गुणवंत मस्के, वय 45 वर्ष, रा. प्लॉट नं. 10 साई नं. 2 हुडकेश्वर रोड नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोहवा मन्नान नौरंगाबादे 9423604828 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर